# अमरावती महानगरपालिका, अमरावती
## दिनांक ०५.१२.२०२२ रोजी प्राप्त प्रशासकीय विषय

**(प्रशासकीय विषय)**

**विषय क्रमांक ४९ :-** डॉ. बाबासाहेब आंबेडकर सभागृहाचे व मनपा आयुक्त यांचे कार्यालयाचे साजसजवात (Interior Work) चे काम करणे या कामाचे सुधारित अंदाजपत्रकात मान्यता प्रदान करणे बाबत.
संदर्भ :- कार्यारंभ आदेश अमनपा/बां.वि./श.अ./कार्य.आदेश/०४८/२०२२, दिनांक २९/०७/२०२२

**ठराव क्रमांक ४९ :-** उपरोक्त विषयाला अनुसरुन अमरावती मनपा कार्यालय येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर सभागृहाचे व मनपा आयुक्त यांचे कार्यालयाचे साजसजवात (Interior Work) या कामाचा करारनामा कंत्राटदार जुझर इंफ्राप्रोजेक्टस अमरावती यांचे सोबत झालेले आहे. सदर कामाचे अंदाजपत्रकीय रक्कम ३,२७,८७,०७१/- इतकी आहे व कार्यारंभ आदेश देण्यात आलेला आहे.

या कामाचे अंदाजपत्रक, नकाशे, अमरावती मनपाचे पॅनल वर असलेले Architect श्री. सुशील खंडारकर यांनी तयार केलेले आहे.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर सभागृहाचे व मनपा आयुक्त यांचे कार्यालयाचे सिव्हिल वर्क सुरु असतांना वेळोवेळी मा. आयुक्त व शहर अभियंता, प्रकल्पाधिकारी यांच्या सोबत पाहणी केली असता त्यांचे दिलेले निर्देशानुसार कामात काही बदल करण्यात आलेले आहे.

Architect श्री. सुशील खंडारकर यांनी दिलेले Estimate अनुसार Interior Design चे दिलेले Planning व Furniture चे काम जागेवर केल्यास खूप वेळ लागणार आहे. व पुढील येणाऱ्या निवडणुकीच्या अनुषंगाने मा. आयुक्त, शहर अभियंता, प्रकल्पाधिकारी व Architect श्री. सुशिल खंडारकर यांच्या सहित चर्चा झाल्यावर व मा. आयुक्त यांनी दिलेल्या निर्देशानुसार Company Made Ready Made Furniture घेण्याकरीता निर्देश दिले आहे. त्यानुसार Architect श्री. सुशिल खंडारकर यांनी १) Excel Seating Pune २) Life Style Dewas MP ३) Spacewood Office Solution Pvt. Ltd नागपुर यांचे कडून Quotation मागितले तसेच Architect श्री. सुशिल खंडारकर यांनी तिन्ही Company चे दिलेले दराचे Comparative Statement तयार केले असून त्यानुसार Spacewood Office Solution यांचे दर कमी असल्याने व त्यानुसार त्यांनी Rate Analysis तयार करुन Revised Estimate तयार केले आहे व सुधारित अंदाजपत्रकाची रक्कम व मुळ अंदाजपत्रकीय रक्कम मध्ये काही बदल झालेला नाही. सदर सुधारीत अंदाजपत्रिकामध्ये Extra Item (१ to ७८) Item चा अंतर्भुत करण्यात आलेला आहे. त्यामध्ये Ready made furniture, Cassette AC. Air Cooling System. Glass Partitions, S.S. Railings, जिन्यावरचे वॉल टाईल्स या कामाचे सुधारीत अंदाजपत्रक मध्ये समावेश करण्यात

आलेला आहे. या सुधारित अंदाजपत्रक Extra Items (१ to ७८) Items सह मा. आयुक्त यांनी दिनांक २०.९.२०२२ रोजी मंजुरी प्रदान केली आहे.

सदर सुधारीत अंदाजपत्रक व कामामध्ये करण्यात आलेले बदलास सर्व साधारण सभेने मंजुरी प्रदान करणे करीता प्रशासकीय विषय सादर करण्यात आलेले आहे. परंतु, सद्यस्थितीत सर्वसाधारण सभा अस्तित्वात नसल्याने सर्व सभेचे अधिकार प्रशासक यांना असल्याने सदर प्रशासकीय विषयास मंजुरी प्रदान करण्यात येत आहे.

ठराव मंजुर व कायम

**स्वा/-**
**नगरसचिव,**
**महानगरपालिका,अमरावती**

**स्वा/-**
**प्रशासक,**
**महानगरपालिका,अमरावती**

नगरसचिव
महानगरपालिका, अमरावती.